# मंत्रिमंडळ निर्णय

३० जुलै २०१४

( मंत्रिमंडळ बैठक क्र.१७६)

| क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | येळ्ळूर येथे मराठी भाषिकांवरील मारहाणीचा राज्य मंत्रिमंडळाकडुन तीव्र निषेध | - |
| २ | राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची स्थापना | मदत व पुनर्वसन |
| ३ | जिल्हा सहकारी बँका, प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांचे सक्षमीकरण करण्यासाठी २३१ कोटी रुपये अर्थसहाय्य | सहकार |
| ४ | जिल्हा न्यायालयांचे आर्थिक अपिल अधिकार वाढवून २५ लाख रुपये केले | विधी व न्याय |
| ५ | राज्यात पावसाला वेग<br>सरासरीच्या ६१ टक्के पाऊस | मदत व पुनर्वसन |

## येळ्ळूर येथे मराठी भाषिकांवरील मारहाणीचा
## राज्य मंत्रिमंडळाकडुन तीव्र निषेध

बेळगाव जिल्ह्यातील येळ्ळूर येथे कर्नाटक पोलिसांनी मराठी भाषिकांवर केलेल्या अमानुष मारहाणीचा, दगडफेकीचा आणि दडपशाहीचा आज राज्य मंत्रिमंडळाने तीव्र शब्दात एका ठरावाद्वारे निषेध केला.

या ठरावात असे म्हटले आहे की, आपल्या न्याय्य हक्कासाठी महाराष्ट्र सरकार आणि सीमाभागातील मराठी भाषिक लोकशाही मार्गाने सनदशीर लढा देत आहेत. याबाबत सर्वोच्च न्यायालयात खटलाही प्रलंबित आहे. असे असतांना कर्नाटक पोलिसांनी केलेली क्रूर मारहाण ही निंदनीय असून मानवी हक्कांची पायमल्ली करणारी आहे.

महाराष्ट्र सरकार सीमाभागातील मराठी भाषिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. कर्नाटक पोलिसांच्या दडपशाहीचा त्रिवार निषेध करून हा लढा सनदशीर मार्गानेच लढण्याचा पुनरुच्चार या ठरावात केला आहे.

-----o-----

मदत व पुनर्वसन विभाग

## राज्य आपत्ती प्रतिसाद दलाची स्थापना

केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या (NDRF) धर्तीवर महाराष्ट्राकरिता स्वतंत्र राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या दोन कंपन्यांची स्थापना करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. तसेच यासाठी ४२८ पदे निर्माण करण्यात येऊन ती मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समितीमार्फत भरण्यात येतील.

महाराष्ट्रात सातत्याने पूर, भूकंप, चक्रीवादळ तसेच पाणीटंचाई अशा नैसर्गिक आपत्ती येतात. प्रत्येक वर्षी राज्यातील १५ ते २० जिल्ह्यांना पूर आणि अतिवृष्टीचा तडाखा बसतो. विदर्भातील काही जिल्हे आणि मराठवाड्याचा काही भाग त्याचप्रमाणे कोयना, रायगड, सातारा, ठाणे हा भाग दुष्काळप्रवण आणि भूकंपप्रवण क्षेत्रात मोडतो. लातूरमध्ये झालेल्या भूकंपामुळे अपरिमित नुकसान झाले होते. त्याचप्रमाणे गेल्या वर्षी विदर्भातील जिल्ह्यामध्ये पुराचा तडाखा बसला त्यावेळी नागरिकांना हलविण्यासाठी पुणे येथे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची मदत घेण्यात आली होती. सध्या ही तुकडी पुणे, तळेगाव दाभाडे येथे असल्याने त्यांना आपत्तीस्थळी पोहचायला खुप वेळ लागतो.

ही पार्श्वभूमी लक्षात घेऊन दोन स्वतंत्र तुकड्या निर्माण करण्यात येतील. प्रत्येक कंपनीत एकूण तीन टीम्स असून प्रत्येकात ४५ अधिकारी व कर्मचारी असतील.

-----o-----

## जिल्हा सहकारी बँका, प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांचे सक्षमीकरण करण्यासाठी २३१ कोटी रुपये अर्थसहाय्य

राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व प्राथमिक कृषि पतपुरवठा सहकारी संस्थांचे सक्षमीकरण करण्याचा महत्वाचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. यासाठी तयार करण्यात आलेल्या योजनेत जि.म.स. बँकांना १३६ कोटी रुपये व प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांना सुमारे ९५ कोटी असे एकूण २३१ कोटी रुपये अर्थसहाय्य करण्यात येईल.

२००६-०७ या वर्षापासून शेतक-यांना ६ टक्के व्याज दराने पीक कर्ज पुरवठा करण्याच्या धोरणामुळे व्याजाचा दुरावा कमी झाल्यामुळे या दोन्ही स्तरातील संस्थांच्या अर्थक्षमतेवर अनिष्ट परिणाम झाला आहे. त्यामुळे त्यांच्या सक्षमीकरणासाठी शासनामार्फत अर्थसहाय्य करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सध्या राज्यात त्रिस्तरीय अल्पमुदत सहकारी पतसरंचनेंतर्गत शेतक-यांना राज्य स्तरावर महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, जिल्हा स्तरावर ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व गांव पातळीवर २१,३८२ प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था पीककर्ज देतात. यामध्ये त्यांना अल्प मुदत, मध्यम मुदत व दीर्घ मुदत शेती कर्ज पुरवठा करण्यात येतो.

राज्यातील कर्ज घेणा-या एकूण शेतक-यांपैकी ६५ ते ७० टक्के शेतक-यांना सहकारी पतसरंचनेमार्फत कर्ज पुरवठा करण्यात येतो.

राज्यातील जि.म.स. बँकांना पीक कर्ज वाटपात होणारा तोटा काही प्रमाणात भरुन काढण्यासाठी बँकांनी केलेल्या पीक कर्ज पुरवठयाच्या प्रमाणात जि.म.स. बँकांना १.७५ टक्के व १.२५ टक्के दराने देण्यात येणाऱ्या व्याज परताव्याच्या धोरणात अंशत: बदल करून सर्व जि.म.स. बँकांना १.५ टक्के व वाढीव १ टक्का असा एकूण २.५ टक्के दराने व्याज परतावा प्रत्येक वर्षी मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी शासनामार्फत रुपये १३६ कोटी रुपये एवढे वाढीव अर्थसहाय्य बँकांना देण्यात येईल.

तसेच राज्यातील प्राथमिक कृषी पुरवठा सहकारी संस्थांच्या सक्षमीकरणासाठी खालील प्रमाणे शासनामार्फत नव्याने अर्थसहाय्य देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

रु. २५ लाख पर्यत पीक कर्ज वाटप केलेल्या संस्थांना- १.५ %

रु. २५ लाख ते ५० लाख पर्यत पीक कर्ज वाटप केलेल्या संस्थांना- १.० %

रु. ५० लाख ते १ कोटी पर्यत पीक कर्ज वाटप केलेल्या संस्थांना- ०.७५ %

रु. १ कोटी पेक्षा जास्त पीक कर्ज वाटप केलेल्या संस्थांना- ०.५० %

---o---

विधी व न्याय विभाग

## जिल्हा न्यायालयांचे आर्थिक अपिल अधिकार वाढवून २५ लाख रुपये केले

जिल्हा न्यायालयांचे आर्थिक अपिल अधिकार १० लाख रुपयांवरुन २५ लाख रुपये करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. याद्दष्टीने मुंबई दिवाणी न्यायालयीन अधिनियम १८६९ मधील कलमात सुधारणा करण्यात येतील.

राज्यात मालमत्तेचे भाव खूप वाढले आहेत. या संदर्भात उच्च न्यायालय तसेच राज्यातील विविध न्यायालयांमध्ये थकीत प्रकरणे वाढत असून सामान्य जनतेला अपिल करण्यासाठी थेट उच्च न्यायालयाकडे धाव घ्यावी लागते. याचे प्रमुख कारण म्हणजे जिल्हा न्यायालयांचे आर्थिक अपिल अधिकार १० लाख रुपये एवढेच आहे. त्यामुळे जिल्हा न्यायालयांचे हे अधिकार वाढणे आवश्यक होते. या संदर्भातील अध्यादेश मंजूर करून येत्या हिवाळी अधिवेशनात विधेयक मांडण्यात येईल.

-----o----

मदत व पुनर्वसन विभाग

## राज्यात पावसाला वेग सरासरीच्या ६१ टक्के पाऊस

राज्यात पावसाला चांगली सुरुवात झाली असून जुलै महिन्यातील सरासरीच्या ६१ टक्के पाऊस (३५८ मि.मी.) आजपर्यंत झाला आहे. या पावसामुळे धरणातील पाणीसाठा ४२ टक्क्यांवर गेला आहे. गेल्या वर्षी हाच पाणीसाठा ५८ टक्के होता.

राज्यातील नाशिक, अहदमनगर, औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, यवतमाळ या १० जिल्ह्यात २६ ते ५० टक्के, ठाणे, रायगड, नंदूरबार, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, लातूर, बुलढाणा, अकोला, वाशिम, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली या १३ जिल्ह्यात ५१ ते ७५ टक्के. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, धुळे, जळगाव, सातारा, वर्धा, नागपूर, गोंदिया या ८ जिल्ह्यात ७६ ते १०० टक्के आणि सांगली व अमरावती या दोन जिल्ह्यात १०० टक्क्यांपेक्षा अधिक पाऊस झाला आहे.

### धरणात ४२ टक्के पाणी साठा

राज्यातील जलाशयात ४२ टक्के साठा असून गेल्या वर्षी याच सुमारास ५८ टक्के पाणी साठा होता. मराठवाड्यातील सर्व प्रकल्पांत केवळ १५ टक्के पाणीसाठा असून कोकणातील प्रकल्पांत ७६, नागपूर ६४ अमरावती ४५, नाशिक २६ आणि पुणे ४६ टक्के असा पाणीसाठा आहे. राज्यात १६९५ टँकर्सद्वारे १४४५ गावांना आणि ३६४० वाड्यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येत आहे.

### पेरणी ६२ टक्के

राज्यातील खरीपाचे सरासरी क्षेत्र १३४.७० लाख हेक्टर असून २८ जुलै पर्यंत ६२ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे.

रोजगार हमी योजनेच्या कामावर १ लाख ८९ हजार मजुरांची उपस्थिती आहे.

-----o-----